# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय रामनगर सृष्टी,
मिरारोड पुर्व, जि. ठाणे दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-८३ दिनांक - ०९/०३/२०२४

## प्रेसनोट

### काशिमिरा पोलीस ठाण्याचे गुन्हे प्रकटीकरण पथकास रुपये - १७,५५,०००/- किंमतीचे १०२ हरवलेले मोबाईल फोन हस्तगत करण्यात यश

काशिमीरा पोलीस ठाणे हद्दीमध्ये वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया कंपनीचे मोबाईल फोन हरवल्याबाबत पोलीस ठाणेस तक्रारी नोंद होत असतात. सदर मोबाईल फोन हरविल्यानंतर नमुद मोबाईल फोनची माहीती ही भारत सरकारने सुरु केलेल्या सी.ई.आय.आर पोर्टलवर भरुन त्यातुन प्राप्त माहीतीचा तांत्रिक अभ्यास करुन तसेच हरविलेल्या मोबाईलबाबत इतर तांत्रिक बाबींचा अभ्यासाचे आधारे मागील पाच महीन्याचे कालावधी मध्ये वेगवेगळया कंपनीचे एकुन-१०२ मोबाईल फोन अंदाजे रुपये-१७,५५,०००/-किंमतीचे हस्तगत करण्यात आलेले आहे.

सदरची कामगिरी श्री. मधुकर पांडे, पोलीस आयुक्त, मि.भा-व.वि पोलीस आयुक्तालय, श्रीकांत पाठक, अपर पोलीस आयुक्त यांचा मार्गदर्शनाखाली प्रकाश गायकवाड, पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ-०१, विजयकुमार मराठे, सहा.पो.आयुक्त, मिरारोड विभाग, राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, काशिमिरा पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सपोनि/योगेश काळे, पोउनि/शिवाजी खाडे, सफौ-रमेश इगवे, सफौ-अनिल पवार, पोह-९६०२७/दिपक वारे, पोह-०८००१/प्रताप पाचुंदे, पोह-१००५३/राहुल सोनकांबळे, पोह-०७१३९/निलेश शिंदे, पोह-१००४२/निकम, पोशि-१२१००/रवी कांबळे, पोशि-१५०१५/प्रविण टोबरे, पोशि-१३११६/किरण विरकर, पोशि-१६००५/राजेंद्र सुर्यवंशी व पोह.०००२०/जयप्रकाश जाधव नेमणुक-मा.पोलीस उपायुक्त कार्यालय, परिमंडळ-०१ यांनी केलेली आहे.

-------ooooo-------